अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत राबविण्यात येणा-या ३% नाविन्यपूर्ण/वैशिष्टयपूर्ण योजनेसाठी मंजूर निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरीत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन ज्ञापन क्रमांक: विघयो २०१७/प्र.क्र . ९४/अर्थसंकल्प
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक -१२ ऑक्टोबर, २०१७

वाचा : १) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७
२) सा.न्या. व वि.स. परिपत्रक क्र. विघयो २०१६/प्र.क्र.१७८/विघयो, दि.२०.१०.२०१६
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शा.नि.क्र. विघयो २०१६/ प्र.क्र. २३०/विघयो, दि.२२ मार्च,२०१७
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पूरक-२०१७/प्र.क्र.१२९/अर्थसंकल्प-३, दि. १८.०८.२०१७
५) सा.न्या.व वि.स.वि. शासन ज्ञापन क्र.बीजीटी २०१७/प्र.क्र.८२/अर्थसंकल्प, दि. १ सप्टेंबर,२०१७

ज्ञापन-

आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात येते की, संदर्भाधिन दि. २२ मार्च,२०१७ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती व नव बौध्दांच्या विकासाच्या दृष्टीने जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजनेखाली ३% वैशिष्टयपूर्ण/नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत विविध उपक्रम राबविणे आवश्यक असल्याने शासन स्तरावर निर्मिती, तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रदान करुन कार्यक्रम कार्यान्वित करण्यासाठी योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

अनुसूचित जाती व नव बौध्दांच्या विकासाच्या दृष्टीने जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजनेखाली ३% वैशिष्टयपूर्ण/नाविन्यपूर्ण योजनेखालील सन २०१७-१८ या वर्षासाठी अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदीच्या ७० टक्के मर्यादेत खर्च करण्यास या ज्ञापनाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हयांना वितरीत करण्यात आलेल्या तरतूदीच्या मर्यादेत विहित प्रयोजनातूनच खर्च करावा. ज्या उद्देशासाठी तरतूद मंजुर आहे, त्या व्यतिरिक्त इतर उद्देशासाठी खर्च करता येणार नाही. तसेच इतर लेखाशिर्षाकडे वळती करता येणार नाही. सदर निधी खर्च झाल्यावर त्याबाबतचे खर्चाचे विवरण (जिल्हानिहाय खर्च / लाभार्थी संख्या) व उपयोगिता प्रमाणपत्र न चुकता शासनास सादर करावे.

३. उपरोक्त योजनेंतर्गत चालू आर्थिक वर्षातील निधी खर्च करण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकाऱ्यांची राहील. तसेच वित्तीय नियमावली, महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका यानुसार वेळोवेळी वित्त विभागाने निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार सदर निधी खर्च करुन कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांची राहील.

४. नियंत्रक अधिकारी यांनी निधी खर्च करताना वित्त विभागाच्या दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या परिपत्रकामधील अटींची पुर्तता झाली असल्याची खातरजमा करुन निधी वितरीत करण्यात यावा.

५. सदर ज्ञापन वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२ दि.१७.०४.२०१५ नुसार प्रशासकीय विभागास प्राप्त वित्तीय अधिकार तसेच या विभागाच्या अर्थसंकल्प शाखेच्या पत्र क्र.बीजीटी-२०१७/प्र.क्र.८२/अर्थसंकल्प, दि.०१.०९.२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१३१५३४५२३९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pooja Bhaskar Udawant

Digitally signed by Pooja Bhaskar Udawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistant, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3a216aeb67842b82e08ea38ee54173f5a527cd40299fd7cb135e0abc12d5ab49, cn=Pooja Bhaskar Udawant
Date: 2017.10.13 15:23:05 +05'30'

(पुजा भा.उदावंत)
कक्ष अधिकारी

प्रति,

१. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती)
२. महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (२ प्रती)
३. सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती
४. सह आयुक्त (अनुसूचित जाती उपयोजना), समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती)
५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
६. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण (२ प्रती)
७. सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण (२ प्रती)
८. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी (जिल्हा परिषद) (२ प्रती)
९. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (२ प्रती)
१०. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
११. महालेखापाल १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३. वित्त विभाग (व्यय-१/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई
१४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

प्रत, माहितीसाठी अग्रेषित -

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव
४. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्य मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
७. शासनाचे मुख्य सचिव,
शासनाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
(अनुसूचित जाती उपयोजनेशी संबंधित सर्व खालील विभाग)
८. ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (२ प्रती)

९. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई (२ प्रती)
१०. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग), मंत्रालय, मुंबई
११. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई
१२. कृषी व पदुम विभाग (कृषि), मंत्रालय, मुंबई
१३. कृषी व पदुम विभाग (पदुम), मंत्रालय, मुंबई (२ प्रती)
१४. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (सहकार, पणन), मंत्रालय, मुंबई
१५. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (वस्त्रोद्योग), मंत्रालय, मुंबई
१६. शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. महिला व बाल कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. सामान्य प्रशासन विभाग (माहिती व जनसपर्क), मंत्रालय, मुंबई
२१. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,
२२. नियोजन विभाग (का.१४८१ / का.१४१३ / का.१४१४/ का.१४११), मंत्रालय, मुंबई
२३. वित्त विभाग, व्यय-१, (अर्थ-३/७), मंत्रालय, मुंबई
२४. सर्व विभागीय आयुक्त,
२५. सर्व विशेष कार्य अधिकारी (नियोजन) विभागीय आयुक्तांची कार्यालये,
२६. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२७. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
२८. संचालक, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, राज्य शाखा, पुणे.
२९. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती / जमाती आयोग, वरळी, मुंबई,
३०. अध्यक्ष, अनुसूचित जाती कल्याण समिती, विधीमंडळ सचिवालय, मुंबई.
३१. सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, १८ वा मजला, मुंबई,
३२. सदस्य सचिव, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय कम्पाऊंड, तळमजला, औरंगाबाद,
३३. सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ,बी-२३/१, साऊथ अंबाझरी मार्ग, अंध विद्यालयाजवळ, नागपूर,
३४. निवड नस्ती (अर्थसंकल्प).